महाराष्ट्र शासन
गृह विभाग
कारागृह व सुधारसेवा विभाग

सुधारणा व पुनर्वसन

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

फोन क्र : (०२०) २६१२३५६३
फॅक्सक्र: (०२०) २६१२५८७८
Email ID : igoffice.ro-mh@gov.in
Website : www.mahaprisons.gov.in

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
जुनी मध्यवर्ती इमारत, २ रा मजला,
पुणे ४११ ००१

---

**सुचनापत्र**

**विषय : परिविक्षा अधिकाऱ्यांच्या कारागृह भेटी बाबत.**

जा.क्र. अपोमसं/सं.अ./परिविक्षा अधि.का.भेट/ २१२५ /२०२२ पुणे १ दिनांक -१७.३.२०२२

प्रस्तावना- सुधारणा व पुनर्वसन हे महाराष्ट्र कारागृह विभागाचे ब्रीद वाक्य आहे. कारागृहातील बंदयाच्या सुधारणा व पुनर्वसनामध्ये महिला व बाल विकास विभागाची पण महत्वाची भुमिका आहे. कारागृहात दाखल पुरूष व महिला बंदयांच्या पासुन विभक्त असलेल्या मुलांच्या भेटी,लहान मुलांना नियमानुसार बालसंगोपन,शिक्षा भोगुन मुक्त होणाऱ्या बंद्याचे पुनर्वसनासाठी दिले जाणारे आर्थिक सहाय्य या सारख्या बाबीमध्ये सदर विभागाची मोठी भुमिका आहे. आयुक्त,महिला व बाल विकास यांचेव्दारे देखील जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी तसेच जिल्हा परिविक्षा अधिकारी यांना अपराधी परिविक्षा अधिनियम १९५८ च्या अंमलबजावणी संदर्भात वेळोवेळी सुचित केले जाते. याशिवाय जनहित याचिका क्र.१०७/२०१४ च्या संदर्भात वेळोवेळी झालेल्या आदेशानुसार सर्व कारागृहांना आवश्यक त्या सुचना मुख्यायालयाव्दारे वेळोवेळी देण्यात आल्या आहेत.तरी या पत्रान्वये काही सुचना पुन्हा देण्यात येत आहे.

१. अपराधी परिविक्षा अधिनियम १९५८ ची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता जिल्हादंडाधिकारी अध्यक्ष असलेल्या समितीचे संबधित कारागृह अधिक्षक हे सदस्य असुन सदर समितीच्या तीन महिन्यातुन एकदा अशा प्रकारे वर्षातुन चार बैठका होणे आवश्यक आहे अशा बैठकांना हजर राहुन वर नमुद प्रश्नांची सोडवणुक करणेबाबत प्रयत्न करण्यात यावे.
२. बाल संगोपन योजनेअंतर्गत महिला व बाल विकास विभाग यांचेकडुन बंद्यांच्या कारागृहाबाहेरील मुलांच्या शैक्षणिक खर्चासाठी अनुदान देण्यात येते.सदर योजनचा जास्तीत जास्त बंद्यांच्या मुलांना लाभ घेता येईल याबाबत प्रयत्न करण्यात यावे.
३. १८ ते २१ वयोगटातील पहिल्याच गुन्हयातील बंद्यांची परिविक्षा अधिनियम अंतर्गत मुक्तता करणेसाठी परिविक्षा अधिकाऱ्यांची मदत घेउन अशा बंद्यांच्या सुटकेबाबत कार्यवाही करणे.

४. परिविक्षा अधिकाऱ्यांच्या मदतीने कारागृहाबाहेरील मुलांची ( वास्तव्य घरी अथवा संस्थेत दाखल ) भेट घडवुन आणणे.याबाबत संबधितांशी संपर्क साधुन कार्यवाही करणे.
५. परिविक्षा अधिकाऱ्यांच्या मदतीने बंदयांच्या मुलाखती घेउन त्यांच्या घरगुती समस्यांचे निराकरण करणे,पत्र पाठविणे,कौटुंबिक कायदेशीर मदत मिळवुन देणे.
६. ज्या कारागृहात महिला बंदयासोबत त्यांची लहान मुले आहेत पण कारागृहाचे बाहेर परिसरात अंगणवाडी नाही अशा कारागृहात पाच पेक्षा जास्त मुले दाखल असल्यास एकात्मिक बाल विकास उपक्रम अंतर्गत अंगणवाडी चालु करण्याबाबत महिला व बाल विकास विभाग यांचेकडे पाठपुरावा करण्यात यावा.
७. कारागृहातील शिक्षा भोगुन मुक्त होणाऱ्या बंद्यांचे पुनर्वसनाकरिता आर्थिक सहाय्य देण्यात येते अशा मुक्त होणाऱ्या बंद्यांची यादी त्यांचे हक्कावर मर्यादा येणार नाही याची खबरदारी घेउन सहा महिने अगोदर संबधित परिविक्षा अधिकारी यांचेकडे पाठविण्यात यावी.व सदर योजनेचा जास्तीत जास्त बंद्यांना कसा लाभ घेता येईल याबाबत प्रयत्नशील असावे.
८. जिल्हा महिला बाल विकास अधिकारी अथवा परिविक्षा अधिकारी यांचेसोबत योग्य तो समन्वय ठेवुन ते कारागृह भेटीस आल्यानंतर त्यांना योग्य ते सहकार्य करणेबाबत संबधितांना सुचना देण्यात याव्यात.

१०/३/२२

**(एस.एन.ढमाळ)**
**प्र.कारागृह उपमहानिरीक्षक (मु.)**
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा
महाराष्ट्र राज्य पुणे. ०१ यांचेकरिता

**प्रति,**

१. अधिक्षक
मध्यवर्ती, जिल्हा, खुले, विशेष कारागृह सर्व
प्राचार्य,किशोर सुधारालय,नाशिक, संपर्क अधिकारी - स्वंतत्रपुर खुली वसाहत,आटपाडी

प्रत.माहितीस्तव.

१. मा. विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह) दक्षिण विभाग,मुंबई,
२. मा.कारागृह उपमहानिरीक्षक,पूर्व विभाग-नागपूर,पश्चिम विभाग-पुणे,मध्य विभाग-औरंगाबाद
३. मा.प्राचार्य,दौलतराव जाधव तुरूंगाधिकारी प्रशिक्षण महाविद्यालय,पुणे.
४. मा.आयुक्त,महिला व बाल विकास आयुक्तालय,२८ राणीचा बाग,जुने सर्किट हाऊस शेजारी,महाराष्ट्र राज्य,पुणे-१
५. मा.डॉ.विजय राघवन,प्रोफेसर,सेंटर फॉर क्रिमिनालॉजी ॲन्ड जस्टीस,स्कुल ऑफ सोशल वर्क,टाटा सामाजिक संस्थान,मुंबई.